## रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. १७२/२०१७ मधील नि. २२ खालील आदेश

१. सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रुल १७ अन्वये दाव्यात दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुत दावा हा दावा मिळकतीमधील वादीच मालकी हक्काचे कब्जे वहिवाटीस प्रतिवादी क्र.१ व २ यांनी हरकत अथवा अडथळा करु नये म्हणुन निरंतर ताकीदीसाठी तसेच दावा मिळकतीची न्यायालयाच्या आदेशाने निमताना मोजणी होवुन हद्दीच्या खुणा कायम करुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

३. प्रस्तुतचा दावा हा प्रलंबित असताना वादीच्या नि.९ वरील अर्जाप्रमाणे दि.१५.३.२०१७ रोजी दावा मिळकतीची मोजणी होवुन संबंधीत खात्याने दि.२०.५.२०१७ रोजी हद्दीच्या खुणा कायम केल्या. सदर मोजणी नकाशामध्ये प्रतिवादी नं.१ व २ यानी वादीचे दावा मिळकतीमध्ये निश्चित असे किती क्षेत्रात अतिक्रमण केले आहे त्याचा स्पष्ट खुलासा सदर नकाशामध्ये संबंधीत खात्याने केलेला नाही. अशी स्थती असताना वादीने नि.११चा अर्ज देवुन दावा मिळकतीची निमताना मोजणीची व त्याप्रमाणे हद्दीच्या खुणा कायम करणेसाठी अर्ज दाखल केला. सदर अर्जानुसार तालुका निरीक्षक भुमी अभिलेख फलटण यांनी निमताना मोजणी केली परंतु त्यामध्येही प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीचे किती क्षेत्रात अतिक्रमण केले याचा उल्लेख केलेला नाही. सदर मोजणीचे नकाशावरुन प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादीचे दावा मिळकतीमध्ये पश्चिम बाजुन दक्षिण–उत्तर असे सुमारे ३ आर एवढया क्षेत्रात अतिक्रमण करुन त्याची वहिवाट प्रस्थापित केलेली आहे. म्हणुन मुळ दावा कलम ८ संपलेनंतर नवीन दावा कलम ८–अ असे नमुद करुन दाव्यात दुरुस्ती मागितली आहे. तसेच दावा कलम १३–अ संपलेनंतर नव्याने १३–ब असे पोटकलम देवुन त्यामध्ये काही मजकुर समाविष्ट करणे इत्यादी प्रकारची दुरुस्ती मागितली आहे.

४. सध्या दावा समन्सची बजावणीचे काम झालेले असुन प्रतिवादी नुकतेच दाव्याचे कामी हजर होत आहेत. वरील प्रमाणेची दाव्यात दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याचा गुणागुणावर व सर्व कायदेशीर बाबींचे पृष्ठयर्थ सोयीचे होणेस व न्यायीक निकाल होणेस मदत होणार आहे. सबब, या कारणास्तव सदर दुरुस्ती अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

५. आजरोजी दाव्याच्या प्रतिवादींना प्राप्त न झालेने प्रतिवादी अदयाप न्यायालयात हजर झालेले नाहीत. अशा परिस्थितीत दावा दुरुस्ती ही नाममात्र व तांत्रीक स्वरुपाची असुन त्यामुळे दाव्याचे ढाच्यात कोणतेही फेरबदल होत नाहीत. दाव्याचा निकाल गुणागुणावर

होण्यासाठी सदरची दुरुस्ती आवश्यक आहे. तसेच सदर दावा दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही.

६. सबब, सदरची दुरुस्ती अभिलेखावर येणे न्यायाच्यादृष्टीने गरजेचे आहे. दावा हा दावा मिळकतीमधील वादीच मालकी हक्काचे कब्जे वहिवाटीस प्रतिवादी क्र.१ व २ यांनी हरकत अथवा अडथळा करु नये म्हणुन निरंतर ताकीदीसाठी तसेच दावा मिळकतीची न्यायालयाच्या आदेशाने निमताना मोजणी होवुन हद्दीच्या खुणा कायम करुन मिळणेसाठी दाखल केला आहे. सदीर दाव्यात प्रतिवादींना निरंतर ताकीद देण्यासाठी असल्याने दावा दुरुस्तीस परवानगी मिळणे न्यायाचेदृष्टीने गरजेचे आहे. सदर दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही.

७. वादीचे मा. वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे मागणीप्रमाणे दुरुस्ती न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार करता सदरची दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचित होणार आहे. सबब खालील आदेश पारीत करते.

**आदेश**

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी मागितलेली दुरुस्ती दाव्यामध्ये १४ दिवसाचे आंत करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

फलटण. (श्रीमती एस.डी.साबळे)

ता.०३/०२/२०२२. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण.